आजचा दिनविशेष

१९५८ : भारतात दशमान (मेट्रिक) पद्धत वापरण्यास सुरूवात झाली.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १ ऑक्टोबर २०२५ | अंक २८१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली

आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# दसऱ्याला राज्यात ५ दसरा मेळावे, ठाकरे, शिंदेंची तोफ कधी धडाडणार?

## जरांगे पाटलांचा दसरा मेळावा 900 एकरवर

मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांचाही बीड जिल्ह्यात दसरा मेळावा होणार आहे. बीडच्या नारायणगडावर या दसरा मेळाव्याची तयारी सुरू झालेली आहे. दरवर्षी नारायणगडावर पारंपरिक पद्धतीने दसरा मेळावा संपन्न होत असतो. गेल्यावर्षी देखील लाखोंच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांचा दसरा मेळावा संपन्न झाला होता. या दसरा मेळाव्याची 350 एकरवर तयारी सुरु असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. पार्किंसह एकूण 900 एकर जमीन दसरा मेळाव्यासाठी तयार केली जात आहे.



## उद्धव ठाकरेंच्या मेळाव्याची जय्यत तयारी

शिवसेनेची शकलं होण्याआधी दरवर्षी मुंबईतील शिवाजी मैदानावर या पक्षाचा मोठा दसरा मेळावा आयोजित केला जायचा. मात्र आता या पक्षाचे दोन गट पडल्यावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा दादरमधील शिवाजी मैदानावर आयोजित केला जातो. यावेळीदेखील हा दसरा मेळावा शिवाजी मैदानावरच होणार आहे. यंदाचा दसरा मेळावा अनेक अर्थांनी वेगळा ठरण्याची शक्यता आहे. कारण या मंचावर मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे. दोन्ही नेते युतीचीही घोषणा करू शकतात, असे सांगितले जात आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे दसरा मेळाव्यानिमित्त 2 ऑक्टोबर रोजी आपल्या भाषणात काय बोलणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## संघाच्या शस्त्र पूजना कडेही विशेष लक्ष



## भगवान गडावरदेखील जय्यत तयारी

भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यादेखील दरवर्षी दसरा मेळावा घेतात. त्यांचा हा मेळावा बीड जिल्ह्यातील भगवान गडावर होत असतो. यावेळीही पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. या मेळाव्यासाठी भव्य मंच उभारण्यात येणार असून मंडपही टाकला जाणार आहे. या मेळाव्यासाठी हेलिपॅड देखील तयार करण्यात आले असून हेलिकॉप्टरने मंत्री पंकजा मुंडे 11 वाजता मेळाव्याच्या ठिकाणी दाखल होतील. सकाळी 11 वाजून 15 मिनिटांनी त्या ध्यान मंदिरात जाऊन पूजा करतील. त्यानंतर 11.30 वाजता मूर्तीपूजन करुन 11.45 वाजता उपस्थितांना संबोधित करतील.

# पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## टंचाईच्या सर्व सवलती मिळणार, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याला प्राधान्य

## आपत्तीग्रस्तांकडून वसुली नको; बँकाना निर्देश

मुंबई, दि. ३० : राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरु केली असून नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत ( मॅन्युअल) अशी व्याख्येचा समावेश नाही. असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# बीड़ शहरातील प्रभाग क्र १७ मधील कचरा घंटा गाडी चालू करा

## नगर परिषद ला बीड़ शहर काँग्रेस कमेटी ची मागनी।



बीड़ प्रतिनिधीः बीड़ शहरातील प्रभाग 17 मधील कचरा घंटा गाड़ी चालु करा अशी मागनी बीड़ शहर काँग्रेस कमेटी चे महासचिव तथा ओबीसी काँग्रेस बीड़ शहर अध्यक्ष सय्यद फरहान यांनी नगर परिषद चे मुख्यधिकारी साहेबाला निवेदन देऊन केली आहे. निवेदन मधे म्हटले आहे की बीड़ शहरातील प्रभाग 17 मधील खंदक रोड़,कीला रोड़,मीलीया कालेज रोड़,जामा मस्जीद रोड़,कीला कमान हरनवल गल्ली,काली मस्जीद व नूरी मस्जीद रोड़ व अजीज पुरा भागात,कचरा घंटा गाडी येत नसल्या मुळे रास्ता वर जागो जागी कचरा चे ढिकारे पड़ले आहे व घानी चे सम्राज्य पसरत आहे व दुर्गंदी वाढत आहे व लोकाच्या आरोग्या ला धोका निर्मान होऊ शकतो त्या मुळे दररोज कचरा घंटा गाड़ी चालु करण्यात यावी अशी मागनी बीड़ शहर काँग्रेस कमेटी चे अध्यक्ष परवेज भाई कुरेशी यांच्या मार्गदर्षना खाली निवेदन देताना बीड़ शहर उपाध्यक्ष मीलींद मस्के ,काजी मुहीब रहेमान,शहर महासचिव सय्यद फरहान,शहर कोषाध्यक्ष आमेर पाशा ,यशवंत मचाले सर यांनी केली आहे।

# नांदूरवेस दुर्गोत्सवाची आरती महादेव ईटके यांच्या हस्ते संपन्न



परळी (प्रतिनिधी) प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी नांदूरवेस दुर्गोत्सव देवीची भव्य अशी परळी शहरातुन मिरवणूक काढून देवीची स्थापना नांदूवेस गल्ली येथे करण्यात आली. देवीची आरती परळी भाजपाचे उपाध्यक्ष महादेव इटके यांच्या हस्ते सहपत्नीक करण्यात आली. यावेळी बोलताना महादेव ईटके म्हणाले की, दुर्गोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी समाजोपयोगी, संस्कृतीक, धार्मिक, शैक्षणिक विविध कार्यक्रम घेतल्या मुळे या भागातील विद्यार्थी , महिलांच्या कलागुणांना वाव मिळाला आहे. यावेळी मंडळाचे अध्यक्ष कृष्णा साळुंके, कार्याध्यक्ष कुषक बागवाले, सचिव रोहन बुद्रे , अतुल बलाळ, सोरभ कापसे, ऋषीं स्वामी ,सुरज गायकवाड, शिवकुमार कोरे, उद्धव कुंभार ,सुदाम धुमाळ, ऋषिकेश बुद्रे, शिवम साळुंके, विशाल राजमाने आदी मंडळ पदाधीकारी, आराधी मंडळ ,गाव भागातील महिला व पुरुष भक्तगण उपस्थित होते .

# गोदावरीच्या पाण्याने घेरले; खा.सोनवणेंनी पाण्यातून जात पुरग्रस्तांचे पुसले आश्रू बैलगाडी, दुचाकीवर बसून घेतल्या नुकसानग्रस्तांच्या भेटी

### माजलगाव तालुक्यातील टाकरवण, शेलगावथडी, रिदोरी, कवडगावथडी, राजेगाव, हिवरा, काळेगावथडी, महातपुरी, पुरूषोत्तमपुरी, जायकोचीवाडी, सादोळा आदि गावात भेटी

माजलगाव: आधीच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नद्या दुथडी वाहत असताना जायकवाडी धरणातून ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. परिणामी, गोदावरीच्या पाण्याने माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना घेरले आहे. दि.३०सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी पाण्यात असलेल्या गावात जावून पुरग्रस्तांचे आश्रू पुसले. यावेळी पुराच्या पाण्यातून गावात जाण्यासाठी त्यांनी बैलगडी, दुचाकीचाही वापर केला.

बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून पाऊस आहे. मध्यल्या काळात अनेकदा अतिवृष्टी झाली. यामुळे सर्वच नद्यांना महापूर आला. नद्यांचे पाणी काही प्रमाणात कमी झाली झाले असताना जायकवाडी धरणातून दोन दिवसांपुर्वी ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. २००६ नंतर पहिल्यांदाच इतके पाणी सोडण्यात आले होते. यामुळे माजलगाव तालक्यातील अनेक गावे पाण्यात आहेत. अनेक गावांना जाण्यासाठी रस्ता राहिलेला नसून मुख्य रस्त्यावर पाणी आहे. दि.३० रोजी सकाळी



खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सुरूवात केली. माजलगाव तालुक्यातील टाकरवण, शेलगावथडी, रिदोरी, कवडगावथडी, राजेगाव, हिवरा, काळेगावथडी, महातपुरी, पुरूषोत्तमपुरी, जायकोचीवाडी, सादोळा आदि गावात भेटी दिल्या. यातील अनेक गावातील रस्त्यावर पाणी आहे. सदरील पाण्यातून जाणे मोठे जिकीरीचे काम आहे. परंतु खा.बजरंग सोनवणे यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यासाठी कवडगावथडी येथे बैलगाडी वापरली. तर काही ठिकाणी दुचाकीवरून प्रवास करत पाण्यातून वाढ काढली.



त्यांनी गावात भेट दिल्यानंतर त्यांनी महिला-पुरूषांशी संवाद साधत, गावात पुर आला, संसार भिजला आहे. यामुळे मोठे नूकसान झाले असून यामुळे कोणीही खचून जाऊ नका. तुम्हाला उभा करण्यासाठी आम्ही सरकारकडून मदत मिळवून देऊ, त्यासाठी मी प्रयत्न करत आहे. गावात ज्यांचे घर पाण्यात गेले आहे, त्यांच्या मदतीने आपणच तातडीने जा, त्यांची अडचण समजून घ्या आणि एकेमकांना मदत करा. सरकारी मदत मिळवून देण्यासाठी आम्ही वेळप्रसंगी लढा उभा करू, पण तुम्हाला एकटे सोडणार नाहीत, असा शब्दही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. यावेळी

## तरुण शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

कवडगावथडी येथे खा.बजरंग सोनवणे हे पोहचल्यानंतर एका तरूण शेतकऱ्यांने रस्त्याशेजारी असलेल्या शेतातील पाण्यात उडी मारली. त्याठिकाणी या शेतकऱ्याचे अडीच एक्कर हळदीचे पिक आहे. त्या शेतकऱ्याने पाण्यात बुडी घेवून हळदीचे पिक उपटून दाखवायला आणले. यानंतर त्या तरूणाला आश्रू अनावर झाले. त्याच्या डोळ्यातील आश्रू पाहून खा.बजरंग सोनवणे यांनी तु काळजी करू नको, तुला उभा करण्यासाठी शासन स्तरावरून मदत मिळवून देतो, त्यासाठी मी तुमच्या पाठिशी आहे, असे म्हणून तरूणाला धीर दिला.

त्यांच्यासोबत माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहन जगताप आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### 1 ऑक्टोबरपासून महत्त्वाच्या नियमांत बदल, जाणून घ्या अन्यथा बसेल मोठा फटका!




सप्टेंबर महिना संपला आहे. आता ऑक्टोबर महिन्याला सुरुवात झाली आहे. नवा महिना चालू झाला की अनेकांना आर्थिक व्यवहार तसेच इतर कामाचे नियोजन करावे लागते. हे नियोजन करताना काही गबड झाली की संपूर्ण महिन्याचा ताळेबंद बिघडण्याची शक्यता असते. दरम्यान, ऑक्टोबर महिन्याचे नियोजन करताना तुम्हाला सरकारच्या बदललेल्या नियमांची कल्पना असणे गरजेचे आहे. या नव्या नियमांची तुम्हाला माहिती नसेल तर ऐनवेळी मोठे संकट उभे राहू शकते. कदाचित तुमचे आर्थिक नुकसानही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या 1 ऑक्टोबपासून नेमके कोण-कोणते नियम बदलले आहेत. तसेच या नियमांचा तुमच्यावर काय परिणाम पडणार आहे? हे जाणून घ्या... 1) येत्या 1 ऑक्टोबरपासून PPF, SCSS, SSY तसेच पोस्ट ऑफिसच्या सर्व स्मॉल सेव्हिंग योजनांच्या व्याजदरात बदल होऊ शकते. हा व्याजदर प्रत्येक तीन महिन्यांनी बदलत असतो. 2) एक ऑक्टोबरपासून एलपीजी सिलिंडरचा दर बदलू शकतो. त्यामुळे येत्या 1 ऑक्टोबर रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कपात होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

3) येत्या 1 ऑक्टोबरपासून रेल्वेचे तिकीट बुक करण्याबाबतही मोठा बदल लागू होणरा आहे. ऑनलाईन तिकीट बुकिंग करताना आधार व्हेरिफाय असणे गरजेचे आहे. रिझर्व्हेशनची प्रक्रिया चालू झाल्यानंतर पहिल्या 15 मिनिटांत आधार व्हेरिफाय असणाऱ्या लोकांनाच तिकीट बुक करता येईल. PRS काऊंटवरून तिकीट बुक करणाऱ्यांसाठी अगोदरचीच प्रक्रिया लागू असेल.4) येत्या 1 ऑक्टोबरपासून यूपीआय फिचरमध्येही बदल केले जाणार आहेत. आता सिलेक्ट रिक्वेस्ट आणि पुल ट्रान्जेक्शन हे फिचर बंद होणार आहे. 1 ऑक्टोबरपासून यूपीआयच्या मदतीने पाच लाखांपर्यंची रक्कम एकाच वेळी पाठवणे शक्य होणार आहे.5) एक ऑक्टोबरपासून एनपीएस योजनेतही मोठा बदल होणार आहे. आता एनपीएस योजनेतील किमान योगदान 1000 रुपये करण्यात आले आहे.

6) एक ऑक्टोबरपासून पेन्शन स्किमच्या नियमांतही बदल करण्यात आले आहेत. NPS, अटल पेन्शन योजना NPS Lite या योजनांचे नियम बदलतील.

7) आता एनपीएस योजनेत गुंतवणूक करणाऱ्या बिगर सरकारी व्यक्तीला त्याच्या एनपीएस खात्यातील 100 टक्के पैसे शेअर बाजारात लावता येणार आहेत. एक ऑक्टोबरपासून ऑनलाईन गेमिंगसाठी नवे नियम लागू होतील. सर्व गेमिंग प्लॅटफॉर्म्सना आता MeitY कडून परवाना घ्यावा लागणार आहे.

8) पोस्ट ऑफिसच्या सेवाशुल्कांमध्येही बदल करण्यात आला आहे. हा बदल येत्या 1 ऑक्टोबरपासून लागू होईल. पोस्ट विभागाने स्पीडपोस्ट आणि ऑनलाईन बुकिंगच्या नियमात बदल केला आहे. नव्या नियमांत ओटीपीवर आधारलेली डिलिव्हरी, रियल टाईम ट्रॅकिंग सुविधादिली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना काही सुट देण्यात आली.

# अंमळनेर-डोंगरकिन्ही-पारगाव गटात होणार पत्रकारांची इंट्री! ते पत्रकार कोण ? सर्वसामान्य जनतेची उत्सुकता शिगेला!

पाटोदा | प्रतिनिधी

पाटोदा पाटोदा तालुक्यातील अंमळनेर–डोंगरकिन्ही–पारगाव जिल्हा परिषद गट व पंचायत समिती घनामध्ये पत्रकारांची इंट्री होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पदाचा आरक्षण अनुसूचित जाती पदासाठी राखीव आहे तर पाटोदा सभापती पद हे ओपन साठी सुटलं आहे त्यामुळे आता आरक्षणाची रंगत वाढणार यात शंका नाही. पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती गट गण निवडणुकीत पत्रकार उतरणार असल्याने चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती गट गणाच्या निवडणुकीत पत्रकारांची इंट्री होणार म्हटल्यावर नेतेमंडळी सुद्धा सावध झाली आहे. कोण कोण पत्रकार या रिंगणात उतरणार आहेत हे सध्या तरी गुलदस्त्यात आहे परंतु




पत्रकार लेखणीबरोबर राजकारणाच्या निवडणुकीत लेखणी सारखंच धारदार काम करण्यासाठी सज्ज झालेलं दिसून येत आहे. राजकारणी कुठेतरी कमी पडल्याचं दिसून येत असल्याने पत्रकारांनी हा निर्णय घेतल्याचा सुद्धा बोलला जात आहे. सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्काचं जिल्हा परिषद व पंचायत समिती मधून काय मिळतं हेच अध्याप माहीत नाही म्हणून पत्रकार त्या दृष्टीने सर्वसामान्य

### योजना खूप परंतु जनतेपर्यंत आले काय ?

जिल्हा परिषद व पंचायत समिती मधून सर्वसामान्य जनतेला शेतकऱ्यांना खूप मोठ्या योजना आहेत परंतु कोणतीच योजना सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही नेत्यांच्या लाभार्थी टोळ्या वगळता सर्वसामान्य जनतेला कसलाच लाभ होत नाही परंतु आता पत्रकारांनी ठरवलं आहे खऱ्या गरजूला न्याय देण्यासाठी निवडणुकीत उतरायचं आणि जनतेला त्यांच्या हक्काच्या योजना मिळवून द्यायच्या.....

जनतेच्या हक्काचं जे आहे ते त्यांना देण्यासाठी या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचं बोललं ही जात आहे.. व सामान्य जनतेला त्यांच्या हक्काचे जिल्हा परिषद व पंचायत समिती मधून काय मिळतं आणि काय असतं हे

### लेखणी निवडणुकीच्या रिंगणात!

लेखणीतून सर्वसामान्य जनतेला जागृत करण्यासाठी प्रकरण नेहमीच काम करत आले आहेत परंतु त्याला अधिक तीव्रता मिळावी व सर्व सामान्य जनतेला त्यांच्या हक्काचं जिल्हा परिषद व पंचायत समिती मधून जे मिळतो ते देण्यासाठी पत्रकार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. योजना खूप आहेत परंतु सर्वसामान्य जनतेपर्यंत येत नाहीत त्याच योजनेची माहिती घेऊन आणि जनतेपर्यंत घेऊन येण्यासाठी पत्रकार निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत.

सांगण्यासाठी देण्यासाठी निवडणुकीत उतरणार असल्याची सुद्धा माहिती मिळाली आहे...

# आरक्षणासाठी बंजारा समाजाचा विराट मोर्चा सकल मराठा समाजाने दिले पाठिंब्याचे पत्र

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : हैदराबाद गॅझेटिअरनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवगातून आरक्षण मिळावे,या मागणीसाठी बंजारा समाजाचा विराट एल्गार मोर्चा २९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात मराठवाड्यासह विदर्भ, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यातील हजारो बंजारा बांधवांसह महिलाही पारंपारिक वेशभुषेत सहभागी झाल्या होत्या. एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी आता बंजारा समाज एकवटला आहे. या मागणीसाठी २९ रोजी सकाळी ११ वाजता मार्केट कमिटी नवा मोंढा मैदान येथून या मोर्चाला सुरुवात झाली. येथे हजारो समाज बांधव एकत्र झाल्यानंतर अण्णाभाऊ साठे चौक, हिंगोली गेट उड्डाणपूल, चिखलवाडी कॉर्नर, महात्मा गांधी पुतळा मार्गे हा विराट एल्गार मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी धडकला. बंजारा समाजाला अनु.जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण मिळालं पाहिजे या प्रमुख मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला बंजारा समाजाच्या या संविधानिक मागणीला सकल मराठा समाजाचा जाहीर पाठिंबा दर्शवण्यासाठी सकल मराठा समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित राहुन कृती समितीकडे पाठिंब्याचं पत्र सुपूर्द केले. मोर्चातील सहभागी बांधवाना पाणी वाटप करून मराठा ऐक्याचं दर्शन नांदेडमध्ये घडवून आणलं.

यावेळी आरक्षण संदर्भात गगनभेदी घोषणा करण्यात आल्या. या मोर्चात मोठ्या संख्येने बंजारा वांधव सहभागी झाले होते. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहोचताच त्याचे रूपांतर सभेमध्ये झाले. यावेळी आ.डॉ.तुषार राठोड, मोर्चाचे संयोजक डॉ.बी.डी. चव्हाण यांच्यासह बंजारा समाजाच्या प्रमुख नेत्यांनी भाषणे दिली. हैदरावाद गॅझेटिअरनुसार सरकारने बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवगातून आरक्षण द्यावे अशी







# १०३४ ग्रामपंचायतींना एकाच दिवशी वेबसाईट बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले

बीड : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीचा कारभार पारदर्शक डिजिटल करण्याचे नियोजन केले आहे. या अनुषंगाने एका आयटी कंपणी च्या सीएसआर निधी च्या उपक्रमातुन बीड जिल्हयातील संपूर्ण 1034 ग्रामपंचायतीची वेबसाईट बनवण्याचे प्रशिक्षण सर्व ग्रामपंचायत अधिकारी व संगणक परिचालक यांना आवघ्या दोन तासात देण्यात आले आहे. यामुळे जिल्हाभरातील बहुतांश ग्रामपंचायतीची स्वतंत्र वेबसाईट तयार करण्यात आली आहे व राहीलेल्या ग्रामपंचायती देखील येत्या 2 दिवसात आपली वेबसाईट तयार करणार आहेत.

बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे डिजिटायझेशनसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.जितीन रहेमान यांच्या मार्गदर्शना खाली प्रयत्न सुरू होते. यासाठी त्यांनी जिल्हाभरातील सर्व सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांची एकदिवशीय कार्यशाळा देखील घेण्यात आली होती. त्यातच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) किशोर काळे यांच्याकडे पुणे येथील एका आयटी कंपनीकडून मोफत वेबसाईट बनवून देण्याचा प्रस्ताव आला. मात्र , या कंपनी चे प्रतिनिधी या सर्व बाबी ऑनलाईनच करणार असुन प्रत्यक्षातत्यांचा कोणीही प्रतिनिधी येणार नसल्याचे संबंधीत कंपनी व्यवस्थापना कडुण सांगण्यात आहे. यावर किशोर काळे यांनी ग्रामपंचायत अधिकारी युनियन प्रतिनिधी व कंपनी प्रतिनिधी यांच्याशी विचार विनिमय करून एकाच वेळी गुगलमिट वर 1000 लोकांना वेबसाईट बनवण्याचे प्रशिक्षण देण्याची हमी अभिनव आयटी सोल्युशन प्रा.ली. कार्यकारी संचालक प्रो.मुरलीधर भुतडा यांनी निडली हायटेक च्या माध्यमातून सर्व ग्रामपंचायतीला मोफत वेबसाईट बनवून देण्याची हमी दिली. यानुसार दि.29 संप्टेबर 2025 रोजी दुपारी 2 ते 4 या वेळेत बीड जिल्ह्यातील 1034 ग्रामपंचायतीना स्वतःची स्वतंत्र वेबसाईट बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सदरील ग्रामपंचायती ची वेबसाईट ही मोबाईल द्वारे हातळता येणार असून यामुळे ग्रामस्थांना तात्काळ सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे .तसेच सरपंच व ग्रामपंचायात अधिकारी यांना देखील ग्रामपंचायती चे कामकाज पारदर्शक व गतिमान करण्यास मदत होणार आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांची जिल्हा परिषदेसह सा.बां. विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ते, पुलांच्या दुरुस्तीला गती; काही कामे प्रगतीपथावर

बीड (प्रतिनिधी) दि. ३० : बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक भागात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे रस्त्यांसह पूल वाहून गेले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन काही गावांचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.३०) जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी तातडीची कामे सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. काही ठिकाणी कामे सुरू असून प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी सांगितले. याआधी राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी नुकताच बीड विधानसभा मतदारसंघाचा पाहणी दौरा केला होता. त्यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्या निवेदनानुसार तातडीची रस्ते व पुल दुरुस्तीची कामे तत्काळ हाती घेण्याचे निर्देश



त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. बैठकीत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागासह बीड, शिरूर कासार तालुक्यातील रस्ते, पुल दुरुस्ती तसेच नवीन रस्त्यांच्या प्रस्तावांवर चर्चा झाली. यावेळी प्रभारी कार्यकारी अभियंता श्री.मोमीन, वरिष्ठ, कनिष्ठ व शाखा अभियंता उपस्थित होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची बैठक झाली. यामध्ये कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, उप कार्यकारी अभियंता चंद्रकांत बोराडे, श्री.हागवणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. दरम्यान, काही ठिकाणची किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्णत्वास गेल्याचेही सांगण्यात आले.

### जि.प. बांधकाम विभागाकडे मांडलेले मुद्दे

पाडळी फाटा ते पाडळी रस्ता, तागडगाव-पाडळी दरम्यान सुमारे १.५ किमी रस्ता, काकडहिरा फाटा-गाव रस्ता, पाडळी खालापुरी ग्रा.क्र.१४ चा ३.५ किमी रस्ता, रौंधवस्तीचा पुल, मंझरीतील मुकादम व धसे वस्ती रस्ते, जांभ-शिरापूर गात ग्रा. क्र.१२१ चा रस्ता व काजळे वस्तीचा पुल, तरडगव्हाण -हाजीपूर -गाजीपूर ग्रा.क्र.१० रस्ता व पुल, पाडळी -जाटवड रस्ता व पुल, पाडळी -ढोकवड ग्रा.क्र.१५ रस्ता, हिंगणी खुर्द येथील ग्रा.क्र.५५१ व ४३६ रस्ते, रुद्रापूर -साक्षाळपिंपरी दरम्यान गीतेवस्ती ग्रा.क्र.२ प्रजामा क्र.२८० रस्ता व पुल, तसेच हिंगणी खुर्द, नाळवंडी व जुजगव्हाण येथील पुल आदी कामांचे प्रस्ताव मांडण्यात आले.

### कपिलधारवाडीत संरक्षण भिंत उभारणार

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वी कपिलधारवाडी येथे जाऊन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली होती. गावात झालेले भूस्खलन लक्षात घेता रस्त्याच्या बाजूने संरक्षण भिंत उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे यांना अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले असून तो प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.


### सूचना होताच पुल दुरुस्तीला सुरुवात

शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथील पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून त्याचाही आढावा घेण्यात आला. तसेच, साक्षाळपिंपरी पुलाच्या दुरुस्तीचे कामही हाती घेण्यात आले आहे. याठिकाणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## कुत्राचं नख लागल्यामुळे रेबिज होतो का? जाणून घ्या तज्ञांचे मत



रेबीज हा रेबीजच्या विषाणूमुळे होणारा जीवघेणा आजार आहे. रेबीज हा कुत्रा चावल्यामुळे होतो. पण आज प्रश्न असा आहे की रेबीज कुत्र्याच्या नखांमुळे देखील होऊ शकतो का? कुत्र्यांशी खेळताना अनेक वेळा कुत्र्यांची नखे मानवी शरीरावर आदळतात. अशा परिस्थितीत लोकांच्या मनात एक भीती आहे की रेबीज नखांमुळे देखील होऊ शकतो. आणि कधीकधी लोक त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात, ते देखील धोकादायक ठरू शकते.डॉक्टरांचे म्हणणे आहे की रेबीजचा धोका सहसा केवळ नखांमुळे नसतो. परंतु जर कुत्र्याची लाळ देखील त्या जखमेच्या संपर्कात आली तर संसर्गाचा धोका वाढू शकतो. अशा परिस्थितीत, सावधगिरी बाळगणे आणि योग्य माहिती असणे महत्वाचे आहे. जर नखे जखमी झाले असतील तर जखमेची चांगली धुतली पाहिजे आणि डॉक्टरांशी संपर्क साधावा लागेल. त्यात उशीर होता कामा नये. कारण जर कुत्र्याला चुकून रेबीजचा संसर्ग झाला असेल तर आपल्याला रेबीज देखील होऊ शकतो, ज्यावर उपचार करणे शक्य नाही. रेबीज विषाणू सामान्यत: संक्रमित प्राण्याच्या लाळेमुळे पसरतो. कुत्रा, मांजर किंवा कोणताही प्राणी एखाद्या व्यक्तीला चावत असेल तर तो संसर्ग त्याच्या लाळेद्वारे जखमेत जातो. येथूनच शरीरात व्हायरस पसरतो. त्यामुळे जनावराने चावा घेतला किंवा ओरखडे काढले तरी ताबडतोब रेबीज प्रतिबंधक लस घेणे योग्य ठरते. फक्त खिळ्यातूनही काही धोका आहे का? गाझियाबादचे जिल्हा पशु कल्याण अधिकारी डॉ. एस. पी. पांडे सांगतात की, नखे खाजवल्याने रेबीज होण्याची शक्यता खूप कमी आहे. परंतु जर कुत्राने अलीकडेच आपली नखे चाटली असतील किंवा त्याचे पंजे चाटले असतील आणि त्याचे नखे किंवा पंजे आपली त्वचा कापतात किंवा रक्तस्त्राव करतात तर संसर्गाचा धोका जास्त असतो. म्हणूनच, स्पष्टपणे समजून घ्या की जेव्हा कुत्र्याच्या लाळेचा आपल्या जखमेशी थेट संपर्क आला असेल तेव्हाच रेबीज होतो.डॉक्टर काय म्हणतात?डॉक्टरांचे म्हणणे आहे की, जर कुत्र्याने नखांनी खाजवले असेल तर सर्व प्रथम ओरखडे असलेली जागा साबणाने धुवा. जखमेवर साबण आणि पाण्याने 10 मिनिटे सतत धुवावे. यामुळे विषाणूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. जर ओरखडे खोल असेल, रक्तस्त्राव होत असेल, कुत्र्याला रेबीजची लस मिळाली नसेल तर डॉक्टरांशी संपर्क साधावा. आपल्या स्थितीवर अवलंबून, आपले डॉक्टर अँटी-रेबीज लस (एआरव्ही) किंवा टिटॅनस इंजेक्शन (टीटी) ची शिफारस करू शकतात.खबरदारी कधी घ्यावी?ओरखडे खोल आहेत ओरखडे पडल्यावर रक्त बाहेर आले आहे. भटक्या कुत्र्याला किंवा लसीकरण झाले नाही खाजवण्यापूर्वी कुत्र्याने पंजा चाटला असावा कुत्र्याच्या नखांच्या खोल जखमा असे झाल्यास ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा. लसींचा संपूर्ण कोर्स घेणे नेहमीच महत्वाचे असते. व्यत्यय येण्याचा धोका आहे. घरगुती उपचारांच्या भानगडीत पडू नका आणि लस घ्या. कुत्र्यांशी खेळताना अनेक वेळा कुत्र्यांची नखे मानवी शरीरावर आदळतात. अशा परिस्थितीत लोकांच्या मनात एक भीती आहे की रेबीज नखांमुळे देखील होऊ शकतो. अशा परिस्थितीत, सावधगिरी बाळगणे आणि योग्य माहिती असणे महत्वाचे आहे. कारण जर कुत्र्याला चुकून रेबीजचा संसर्ग झाला तर आपल्याला रेबीज देखील होऊ शकतो.

# दुष्काळी बीड जिल्हा! शब्द पुसण्यासाठी ठोस उपाययोजना हव्या : पै.सतीश शिंदे

### अतिवृष्टी अन शेतकऱ्यांच्या व्यथा घेऊन पै.सतीश शिंदे पक्षश्रेष्ठीकडे!

### संसदरत्न खा.सुप्रिया सुळे व प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मांडल्या व्यथा!





आष्टी | प्रतिनिधी बीड जिल्ह्यात निसर्गाने केलेला अतिवृष्टीचा कहर खूप भयंकर होता. या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडी आलेला घास हिरावून घेतला आहे. जनावर वाहून गेले आहेत. जमिनी खोदून गेल्या आहेत. या सर्व अतिवृष्टीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे व प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे बीड जिल्हा युवक अध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी व्यथा मांडून आर्थिक मदत मानसिक आधार देण्याची मागणी केली आहे. अतिवृष्टी ही खूप भयंकर होती. ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट पन्नास हजार एकरी तर तसेच ज्या शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली आहेत जमिनी खोदून गेले आहेत अशांना आर्थिक मदत देऊन आधार द्यावा तसेच अनेक ठिकाणी घरांच्या पडझडी झाल्या आहेत त्यांनाही घर उभारण्यासाठी शासनाने आधार द्यावा अशा विविध मागण्यांचं पत्र युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी पक्षश्रेष्ठीकडे दिले आहे. बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो त्यात आता ओला दुष्काळ झाला आहे तोही बाजूने बीड जिल्ह्यातील नागरिकांना शेतकऱ्यांना घेरले आहे यातून बाहेर काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने नेहमीच आवाज उठवला जात आहे पुढेही उठवला जाईल त्यांना न्याय मिळवून दिला जाईल याकरिता संसद रत्न सुप्रियाताई सुळे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांना परिस्थितीचा आढावा जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी दिला आहे. यावर लवकरच दिलासादायक मार्ग निघेल आणि सर्वसामान्य जनतेला आधार देऊच असे पक्षश्रेष्ठकडून सांगण्यात आले यावेळी प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, प्रदेश सचिव रिजवान शेख, युवक बीड जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे हेही उपस्थित होते..

### बीड जिल्ह्याचा दुष्काळ शब्द कधी निघेल!

बीड जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणून बघितला जातो. परंतु आता ओला दुष्काळ झाला आहे. दुष्काळ शब्द हा बीड जिल्ह्यासाठी कलंकित शब्द आहे की काय ? प्रश्न उपस्थित होत आहे. दुष्काळ हा शब्द पुसण्यासाठी आता मोठे पाऊल उचलली पाहिजेत अशीच अपेक्षा आहे. हा दुष्काळ शब्द कायमचा पुसावा यासाठी राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष सतीश शिंदे यांनी पक्षश्रेष्ठीकडे मागणी करून ठुस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे..

# भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थित रहा – जिल्हाध्यक्ष सुवर्णाताई लांबरुड

### मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी जमणार लाखोंचा जनसमुदाय!



आष्टी | प्रतिनिधी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भगवान भक्तीगड सावरगाव घाट येथे दसरा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. दसरा मेळाव्याला संबोधित करण्यासाठी मंत्री नामदार पंकजाताई मुंडे उपस्थित राहणार असून लाखोच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष सुवर्णाताई लांबरुड यांनी केले आहे. दसरा मेळाव्यातून विचाराचा सोनं लुटण्यासाठी लाखोंचा जनसमुदाय भगवान भक्तीगड सावरगाव येथे जमत असतो याही वर्षी मोठ्या उत्साहात हा दसरा मेळावा संपन्न होणार असून मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे तसेच विचाराचे सोने लुटून ताईसाहेबांचे हात बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष सुवर्णाताई लांबरुड यांनी केले आहे...



# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 50 हजार रुपये मदत द्या

### नांदेड हैदराबाद महामार्गावरील मारतळा येथे शेतकऱ्यांचा रास्ता रोको

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतातील विविध पिकांचे अतोनात नुकसान झाले. मो-ठ्या प्रमाणात पशुधन दगावले, वित्तहाणी झाली. यामुळे ओला दुष्काळ जाहीर करावी, या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नांदेड-हैदरावाद महामार्गावरील मारतळा येथे शेकडो शेतकऱ्यांनी ३० सप्टेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी महामार्गावर काहीवेळ वाहतूक ठप्प झाली होती. नांदेड जिल्ह्यात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची खरिपातील पिके व जमीनी खरडून मोठे नुकसान, कांही शेतकऱ्यांची जनावरे पुरात वाहून गेली. यामुळे शेतकरी चिंतेत असताना शासनाकडून अद्याप मदत मिळालेली नाही. यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आलो दुष्काळ जाहिर करा, प्रति हेक्टरी ५० हजार रुपये मदत, कर्जमाफी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना १० लाखांची मदत, पिक विमा आदींसह मागण्यासाठी मंगळवार ३० सप्टेंबर रोजी सकाळी रास्ता रोको आंदोलन करत शेकडो शेतकऱ्यांनी महार्गावर ठिय्या मांडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. यावेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी नायव तहसीलदार राजेश पाठक, कापसी मंडळ अधिकारी शिवकांता पवार, ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण गोधणे, मोतीराम पवार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. खवरदारीचा उपाय म्हणून उस्माननगर पोलीस ठाण्याचे सपोनि संजय निलपत्रेवार यांनी बंदोवस्त ठेवला होता. यावेळी प्रदिप ढेपे, संतोष गव्हाणे, किरण



गव्हाणे, प्रविण जाधव, अंकुश कोल्हे, भागवत ढेपे, संभाजी वरडोळे, शहाजी कदम, रामराव ढेपे, ज्ञानेश्वर उवाळे, अच्युत ढेपे, भगवान सोमवारे, चंद्रकांत हंवर्डे, परमेश्वर हंबर्डे, धनराज चिंचोलीकर, हणमंत भरकडे, भास्कर सोमवारे, संतोष शिदि, मारोती कपाळे, वाळु कपाळे आदींसह कापसी मंडळातील २८ गावे व वाडी तांडयातील शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभाग नोंदवला. संतप्त शेतकऱ्यांनी सरकार विरोधी घोषणाबाजी करण्यात आली.

# ओला दुष्काळ जाहीर करा व एकरी 50,000 रु अनुदान द्या .माऊली मार्कंड

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी गेल्या दोन महिन्यांपासून संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेतजमिनीवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे... बीड जिल्ह्यात सततच्या पावसाने सोयाबीन, कापूस, तूर व फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच शेतमजुरांचा सुद्धा रोजगार बुडाला आहे. या भीषण परिस्थितीत सरकारने जबाबदारी घेऊन मदत करावी. कारण या अतिवृष्टी व ढगफुटीने शेतकऱ्यांच , शेतमजूरांच , कामगारांच मोठ नुकसान झालेलं आहे शेती पुरपणे पुराच्या पाण्यान वाहुन गेली.काही ठिकाणी मातीसह खरडुन गेली.व शेतात पाणी साचल्याने पीक नुकसान झाली आहे .या मुळे शेतकऱ्यांच उत्पादन शुन्य होणार आहे. आता पर्यंत केलेला खर्च हा पुर्णपणे बुडाला .व शेती आता कसण्या योग्य करण्यासाठी खूप मोठा खर्च शेतकऱ्यांना येणार आहे .तरी सरकारने भरघोस कशी मदत करावी म्हणजे एकरी 50,000 रु . द्यावे .शेतकऱ्यांना उत्पादन शुन्य झाल्याने शेतमजूरांना कोणी मजूर म्हणून कामावर बोलवणार नाही त्यांना मजुरी मिळणार नाही. पर्यांने उपासमारीची वेळ हि शेतमजूरांवर येणार आहे. त्यामुळे एकंदरीतच सरकारने गांभीर्याने या विषयाकडे लक्ष द्यावे व मराठवाड्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था सुव्यवस्थित आणण्यासाठी खालील मागण्याची अंमलबजावणी करावी.

मागण्या :-

1. संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करून सर्व शेतकऱ्यांना एकरी 50000 पन्नास हजार रुपये मदत द्या..* . सरसकट संपूर्ण पीक कर्जमाफी करा.* * सर्व शेतमजुरांना 10000 दहा हजार रुपये मदत द्या..* शेतकरी शेतमजुर तसेच पूरग्रस्त नागरिकांच्या विद्यार्थी पाल्यांची शालेय व महाविद्यालयीन संपूर्ण वर्षाची फी माफ करा..* पूरग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई द्या व त्यांचे पुनर्वसन करा... एनडीआरफ च्या निकषाच्या चार पट मदत सरकारने करावी अशी मागणी. राष्ट्रीय समाज पक्ष लोकसभा अध्यक्ष विक्रम बप्पा सोनसळे. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष माऊली मार्कंड . रासप जिल्हाध्यक्ष बीड साईनाथ विघ्ने .युवक जिल्हाध्यक्ष मधुकर केदार सर. रासप तालुका अध्यक्ष शिरूर शाम माहनोर. उप तालुका अध्यक्ष नामदेव ढाकणे. विद्यार्थी तालुकाध्यक्ष चक्रधर सानप. यांच्या वतीने करण्यात आली आहे.अजित पवार यांनी भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्यावरही भाष्य केलं आहे. त्यांनी म्हटलं की, 'यश मिळाल्यानंतर भारतीयांना आनंद वाटतो, पाकिस्तानने ज्या काही कुरघुड्या केल्या, ऑपरेशन सिंदूर नंतर झालं. त्यानंतर खेळायला नको असं काहीचं मत होतं. ज्यांच्या घरातील व्यक्ती गेली, त्यांचं म्हणणं होतं खेळायला नको आणि काहींचं म्हणणं होतं खेळात हे सगळं नको. मात्र आता सामने संपलेले आहेत.'

**राज्यातल्या शेतकरी आर्थिक संकटात, सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात यावी ,राष्ट्रीय समाज पक्ष आक्रमक**



दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बुधवार १ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# आता ऑक्टोबरमध्ये नवं संकट येणार, हवामान खात्याच्या अंदाजाने खळबळ

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशांतील विविध राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. मात्र संकट अजूनही टळलेले नाही. ऑक्टोबर महिना आणखी आव्हानात्मक ठरणार आहे. हवामान विभागाने ऑक्टोबरमध्ये संपूर्ण भारतात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील महिन्यात सामान्य पातळीपेक्षा 115% जास्त पाऊस पडणार आहे अशी माहिती आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. ऑक्टोबरमध्ये सरासरीच्या 115% पाऊस पडण्याची शक्यता

मृत्युंजय महापात्रा यांनी पुढील ऑक्टोबर महिन्यातील पावसाच्या अंदाजाबाबत भाष्य केले आहे. त्यांनी म्हटले की, सप्टेंबरमध्ये सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडला. आता ऑक्टोबरमध्ये गेल्या 50 वर्षांच्या सरासरीच्या 115% पेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सप्टेंबरमधील पावसामुळे शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे, अनेकांची पिके पाण्याखाली गेली आहेत, शेतकरी अडचणीत असताना आता त्याच्यासमोर नवं संकट येणार आहे भारतात पावसाळा सप्टेंबर अखेरपर्यंत संपतो, मात्र यंदा मान्सून लांबला आहे. देशाच्या काही भागात अजूनही मुसळधार पाऊस कोसळत आहे. आता ऑक्टोबरमध्येही मुसळधार



पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ज्या शेतकऱ्यांची पिके वाचलेली आहेत, त्यांना आता नवा धोका निर्माण झाला आहे. जास्त पाऊस पडण्याचे कारण काय?

दरवर्षी बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातून येणारे ओले वारे उत्तरेकडे आणि पश्चिमेकडे जातात. जेव्हा हे वारे उत्तर भारतातील थंड वारे आणि पश्चिमेकडील विक्षोभांशी टक्कर देतात तेव्हा मुसळधार पाऊस पडतो. तसाच पाऊस आता पडत आहे. आणखी एक कारण म्हणजे जागतिक तापमानवाढीमुळे मान्सून आणि इतर हवामान प्रणाली असामान्यपणे सक्रिय होत आहे, त्यामुळे सध्या पाऊस पडत असल्याचे समोर आले आहे.पिकांचे मोठे नुकसान

ऑक्टोबरमध्ये भात, मका आणि सोयाबीनच्या पिकांची काढणी केली जाते. मात्र यंदा ऑक्टोबरमध्ये मुसळधार पावसाची शक्यत आहे. त्यामुळे या पिकांच्या काढणीवर परिणाम होऊ शकतो आणि पिकांचेही नुकसान होऊ शकते. तसेच इतर पिकांवर रोगराई वाढण्याची शक्यता आहे. याचा पिकाच्या उत्पादनावर परिणाम होऊ शकते. तसेच पावसामुळे शहरी भागात पाणी साचते, त्यामुळे शहरी भागातही पावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

# बळीराजाच्या मदतीसाठी कु.आरूषीने दिला जिल्हाधिकाऱ्यांना ४ हजारांचा धनादेश

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे न भरून निघणारे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाकडून मदत मिळावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. विविध सामाजिक संघटना व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस फंड दिला जात आहे.लोहा तालुक्यातील वाळकी (बु) येथील आरूषी शिवशंकर पाटील बेटकर हिने रक्षाबंधनात मिळालेली ओवाळणी व खाऊ साठी जमवलेली रक्कम ४ हजार रूपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत म्हणून दिली आहे. अतिवृष्टीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेत आहे. प्रशासनाकडून अजूनही मदत जाहीर झाली नाही. मुख्यमंत्री सहाय्यता निधीत विविध धार्मिक संस्था, राजकीय पुढारी व प्रशासकीय अधिकारी मदत करत आहेत. यातच लोहा तालुक्यातील वाळकी (बु) येथील इयत्ता तिसरीमध्ये शिकत असलेली आरूषी हिने रक्षाबंधनानिमित्त मिळालेली ओवाळणी एक सामाजिक बांधिलकी



जोपासण्यासाठी पुढाकार घेत आई-वडिलांच्या विचारातून ४ हजार रूपयांचा धनादेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे सुपूर्द केला आहे. तिच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## उपविभागीय अधिकारी माजलगाव गौरव



इंगोले साहेब तहसीलदार संतोष रुईकर साहेब यांना गेल्या पाच ते सहा दिवसापासून फोन द्वारे मेसेज द्वारे सांगितले होते की शुक्ल तीर्थ लिमगाव चा मुख्य रस्त्यावर दहा ते पंधरा फूट पाणी असल्यामुळे एक ndrfची पथकासह अॅम्बुलन्सची मागणी केली होती आज गावातील एक लहान बाळाला एक चार ते पाच वर्षाच्या मुलाला शॉक लागला आणि एक डिलिव्हरी पेशंटला दोन ते तीन किलोमीटर चिखलातून सोन्याथडी मार्गे माजलगाव दवाखान्यात हलविण्यात आले आहे तरी आपण ndrfच्या पथकासह अॅम्बुलन्सची सेवा करायची सांगितली होती पण आणखीन काही शासनाने दखल घेतलेली नाही उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले साहेब यांच्याशी फोनवर चर्चा केली असता त्यांनी गावचे तलाठी राठोड यांना सांगितले पण त्यांनीही काही दखल आतापर्यंत घेतलेली नाही जर काही गावातील नागरिकांना एखादी व्यक्ती आजारी पडून जीवित हानी झाली तर जबाबदार कोन...भाई मुंजा पांचाळ माजलगाव तालुका चिटणीस शेकाप

## एसटी महामंडळाचा मोठा निर्णय, १० टक्क्यांनी तिकीट महागणार,




सध्या सणासुदीचा काळ आहे. दिवाळी तोंडावर आली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरांत नोकरी, कामास-ाठी आलेले चाकरमानी दिवाळी साजरी करण्यासाठी आपापल्या गावी जातात. दिवाळीच्या काळात लहान मुलांच्या शाळेलाही सुट्टी असते. त्यामुळे याच काळात काही कुटुंब फिरायला जाण्या-चाही प्लॅन करतात. दरम्यान, आता याच सणासुदीच्या काळात एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महामंडळाच्या या निर्णयामुळे आता एसटीने प्रवास करणे महागणार आहे.

# पूरामुळे लुखेगाव ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे नुकसान,वीजपुरवठा खंडित व आरोग्य समस्या

माजलगाव प्रतिनिधी ग्रामपंचायत लुखेगाव येथे आलेल्या अलीकडील पुरामुळे ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे तसेच गावातील मूलभूत सुविधांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात ग्रामपंचायतीने, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, वीज वितरण कंपनी व आरोग्य विभाग आदी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.पूराच्या परिणामस्वरूप ग्रामपंचायतीच्या विहिरीतील पाणीपुरवठा यंत्रणा - मोटर, पाईप, गर्डर व स्टार्टर



सेट निकामी झाले असून स्मशानभूमीतील शेडमधील सांगडा तुटला आहे. तसेच पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन व हौद यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

गावातील वीजपुरवठा देखील खंडित झाला असून विद्युत तारा व पोल मोडकळीस आलेले आहेत. त्यामुळे वीज वितरण कंपनीकडून तातडीने दुरुस्ती करून पुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय पूरानंतर आरोग्यविषयक समस्या उद्भवू नयेत यासाठी आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके तैनात करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी विनंती ग्रामपंचायतीच्या निवेदनात नमूद करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या निवेदनानुसार, नुकसानग्रस्त मालमत्तेची तातडीने पाहणी करून शासनस्तरावरून निधी उपलब्ध करून दुरुस्ती व पुनर्बांधणीची कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. हे निवेदन ग्रामपंचायत लुखेगावचे सरपंच नासेरखा पठाण, ग्रामपंचायत अधिकारी महेश गेंदले यांच्या स्वाक्षरीने संपूर्ण ग्रामपंचायतच्या वतीने देण्यात आले. यावेळी खय्युम पठाण, वाजेद पठाण, फिरोज पठाण, म हेमूद पठाण, अविनाश वानखेडे, किंचिक वानखेडे, शाहेद पठाण आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्युत रोहित्र साठीची नियुक्त बजाज एजन्सी कडून पूरग्रस्तांसह महावितरण ला ही फसवण्याचा प्रयत्न ..

माजलगाव प्रतिनिधी. माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील कोरडे वस्तीवर शासन मान्य डीपी फिल्टर एजन्सी नामे बजाज यांच्याकडून नादुरुस्त असलेले विद्युत रोहित्र पूरग्रस्त जनतेच्या माथी मारण्यात येत आहेत तर दुरुस्त आणि चांगल्या रोहित्राचा बाजार मांडला जात आहे पूर परिस्थितीमुळे लाखो शेतकऱ्यांचे संसार पाण्यात जाऊन उघड्यावर पडले आहेत महावितरने एजन्सीला रोहित्र दुरुस्तीचे टेंडर दिले आहे त्या बजाज एजन्सी कडून पूरग्रस्त शेतकऱ्याची फसवणूक तर करण्यात येत आहेच मात्र महावितरणच्या ही डोळ्यात धडधड अंजन घालण्याचा प्रयत्न चालू आहे नादुरुस्त विद्युत रोहित्र पूरग्रस्त तथा भोळ्या भाबड्या गावकऱ्यांना बसवून देऊन शेतकऱ्याची फसवणूक करून शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळण्यासारखे प्रकार करीत आहे तर दुरुस्त्याने चांगल्या क्वालिटीचे रोहित आठ हजार पासून ते पंचवीस हजार पर्यंत च्या किमतीत बाहेर जिल्ह्यात विकले जात आहेत महावितरण चे जिल्हाध्यक्ष राजपूत यांना यापूर्वीच कल्पना दिलेली आहे आपल्या जिल्ह्यातून डीपी विद्युत रोहित्र याची मोठ्या प्रमाणात तस्करी चालू आहे मात्र या गोष्टीकडे अधीक्षक अभियंता राजपूत यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सदर योजनेचे मोठ्या प्रमाणात मनोबल वाढले आहे फुले पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार शेख जुनेद यांनी मुख्य अभियंता महावितरण अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता अंबाजोगाई माजलगाव येथील बजाज डीपी फिल्टर एजन्सीवर कारवाई करावी म्हणून मोबाईल द्वारे संपर्क केलेला आहे त्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांनी एजन्सीवर कार्यवाही करावि अशी मागणी केली आहे मात्र अधीक्षक अभियंता याकडे कोणत्या नजरेने पाहत आहेत याकडे लक्ष लागले आहे वास्तविक पाहिले तर विद्युत रोहित्र फेल झाल्यानंतर लाईनमन हे जे इ यांना विद्युत रोहित्र फेल झाला म्हणून माहिती देत असतो त्यानंतर जे इ हा फेल रिपोर्ट तयार करून उपअभियंता यांची स्वाक्षरी घेऊन कार्यकारी अभियंता यांच्याकडे सदर माहिती पुरविली जाते कार्यकारी अभियंता यांच्याकडून ज्या एजन्सीला ट्रान्सफॉर्मर रिपेरिंगची ऑर्डर दिलेली आहे त्या एजन्सीला कल्पना देऊन फेल झालेला ट्रांसफार्मर घेऊन त्या ठिकाणी नवीन ऑइल बदलून ट्रान्सफॉर्मर रिपेअर करून दिला जातो परंतु माजलगाव तालुक्यामधील बजाज एजन्सी कडून शासनाला चुना लावण्याचे काम चालू आहे म्हणजेच ट्रांसफार्मर फेल झाल्यानंतर त्यामधील कोणतीही ऑइल न बदलून



देता आहेत तसे परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना व पूर ग्रस्त लोकांना रोहित्र देऊन शासनाकडून पैसे उकळण्याचे काम चालू आहे परंतु महावितरणचे अधिकारी डोळे झाक करण्याचे काम करीत आहे म्हणून संबंधित एजन्सीवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असे सामाजिक कार्यकर्ते शेख जुनेद यांनी सांगितलेले आहे आता तरी अधीक्षक अभियंता रजपूत साहेब बीड जिल्ह्या बाहेर होणारी रोहित्रा ची तस्करी थांबवून बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कसा न्याय मिळेल यासाठी प्रयत्न करतील अन्यथा एजन्सी सोबत महावितरण चा सहभाग आहे असे गृहीत धरून भविष्यात मोठ्या प्रमाणात आंदोलन केले जाईल असेही सामाजिक कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com